# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 16 December 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १६ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून प्रारंभ–कालावधी वाढवण्याची विरोधकांची मागणी
- राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार–३३ कॅबिनेट तर सहा राज्यमंत्री–मराठवाड्यातल्या सहा जणांचा समावेश
- एक राष्ट्र एक निवडणूक या विषयी दोन विधेयकं आज लोकसभेत सादर करण्यात येणार
- परभणी हिंसाचार प्रकरणातला आरोपी सोमनाथ सूर्यवंशी याचा उपचारादरम्यान मृत्यू

आणि

- बॉर्डर–गावस्कर चषक क्रिकेट कसोटी मालिकेच्या तिसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलिया संघ पहिल्या डावात ४४५ धावांवर सर्वबाद

****

राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन आजपासून नागपूर इथं सुरु होत आहे. या अधिवेशनात २० विधेयकांवर सदनात चर्चा होईल, यापैकी १४ अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवून त्यांचं विधेयकात रुपांतर करण्यात येणार आहे. तर सहा नवीन विधेयकं मांडण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. विरोधी पक्षाने विविध संसदीय आयुधांचा वापर करून उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांवर चर्चा करून, राज्याच्या आणि जनतेच्या हितासाठी निर्णय घेण्यात येतील, असं फडणवीस यांनी सांगितलं.

मंत्र्यांच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळाबद्दल विचारलं असता, सर्व मंत्र्यांच्या कामकाजाचं मूल्यांकन करणार असून, जे मंत्री योग्य काम करत नसल्याचं लक्षात येईल, त्यांच्याबद्दल पुनर्विचार केला जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले...

***“हम पर्फोमंस ऑडिट ये निश्चित रूप से हर मंत्री का करेंगे और पर्फोमंस ऑडिट मे जहां ये ध्यान मे आएगा की मंत्री उचित काम नही कर रहे हैं, उस समय उस मंत्री का पुनर्विचार किया जाएगा.’’***

बीड जिल्ह्यातल्या घटनेची विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना, सर्वसामान्य जनता आणि राज्याच्या विकासासाठी काम करणार असल्याचं सांगितलं तर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, विरोधकांचा योग्य सन्मान ठेवला जाईल, अशी ग्वाही दिली.

****

दरम्यान, अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारच्या चहापानावर विरोधी पक्षांनी बहिष्कार घातला. विधान परिषदेतले विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड या महाविकास आघाडीच्या नेत्यांनी काल पत्रकार परिषदेत ही भूमिका स्पष्ट केली. बीडमध्ये सरपंचासह वर्षभरात ३२ हत्या प्रकरणं, परभणीतली अप्रिय घटना, या सगळ्या प्रकरणाची उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तींची समिती नेमून त्याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी, या नेत्यांनी यावेळी केली. महायुती सरकारमधल्या घटक पक्षांनी निवडणुकीच्या काळामध्ये जी आश्वासनं शेतकऱ्यांना आणि लाडक्या बहिणींना दिली, ती त्यांनी तातडीने पूर्ण करावी, अधिवेशनाचा कालावधी वाढवावा, अशी मागणी दानवे यांनी केली. ते म्हणाले:

***“तीन–तीन आठवड्यांचं एकेक महिन्यांचं होणारं अधिवेशन आता पाच दिवसांवर आणि सहा दिवसांवर येऊन ठेपलेलं आहे. आणि त्याच्यातच कोणत्याही प्रकारे लक्षवेधी नाही, प्रश्न उत्तरे नाही अशा प्रकारची स्थिती आहे. आणि या स्थितीमध्ये भलेही छोटं अधिवेशन असेल पण एक विरोधी पक्ष म्हणून ताकदीने या सरकारच्या सगळ्या कारभाराला, स्थितीला विरोध***

***करण्याचा निर्णय आम्ही सगळ्या महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी घेतलेला आहे.''***

विधानसभेत विरोधी पक्ष नेते पदाबाबत महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नाहीत, याउलट अध्यक्षांनी परंपरा लक्षात घेता आघाडीच्या नेत्याला विरोधी पक्षनेते पद द्यावं, अशी मागणी देखील यावेळी करण्यात आली.

****

राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार काल करण्यात आला. नागपूर इथं झालेल्या या शपथविधी सोहळ्यात राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी ३३ जणांना कॅबिनेट मंत्रिपदाची, तर सहा जणांना राज्यमंत्रिपदाची शपथ दिली. नव्या मंत्रिमंडळात भाजपचे चंद्रशेखर बावनकुळे, राधाकृष्ण विखे पाटील, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, मंगलप्रभात लोढा, जयकुमार रावल, अशोक उईके, आशिष शेलार, जयकुमार गोरे, संजय सावकारे, आकाश फुंडकर, यांच्यासह सर्वाधिक १९ मंत्री, शिवसेनेचे गुलाबराव पाटील, संजय राठोड, उदय सामंत, शंभुराज देसाई, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, यांच्यासह ११ मंत्री तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हसन मुश्रीफ, दत्ता भरणे, अदिती तटकरे, माणिकराव कोकाटे, नरहरी झिरवाळ, मकरंद जाधव पाटील यांच्यासह नऊ मंत्र्यांचा समावेश आहे.

भाजपच्या माधुरी मिसाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे इंद्रनील नाईक, शिवसेनेचे योगेश कदम, तर अपक्ष आमदार आशिष जैस्वाल यांच्यासह सहा जणांना राज्य मंत्रिपदाची शपथ दिली.

**''नागपुरात सुमारे साडे तीन दशकांनंतर झालेल्या या शपथविधी सोहळ्यात काही माजी मंत्र्यांचं राजकीय पुनर्वसन आणि शिवेंद्रसिंहराजे भोसले, पंकज भोयर, नितेश राणे अशा नवीन चेहऱ्यांचा समावेश, ही या मंत्रिमंडळ विस्ताराची वैशिष्ट्ये ठरली.**

**मराठवाड्यातल्या सहा जणांना या मंत्रिमंडळात स्थान मिळालं.**

**गेल्या विधानसभा तसंच लोकसभा निवडणुकीतल्या पराभवानंतर विधान परिषदेवर गेलेल्या भाजपच्या पंकजा मुंडे, गेल्या सलग दोन मंत्रिमंडळात स्थान मिळालेले राष्ट्रवादी काँग्रेसचे परळीचे आमदार धनंजय मुंडे छत्रपती संभाजीनगरमधल्या औरंगाबाद पूर्वचे भाजप आमदार अतुल सावे या अनुभवी मंत्र्यांसह औरंगाबाद पश्चिमचं सलग चौथ्यांदा प्रतिनिधित्व करणारे शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट, जिंतूर विधानसभा मतदारसंघातून**

**दुसऱ्यांदा विजयी झालेल्या मेघना बोर्डीकर साकोरे, आणि लातूर जिल्ह्यातल्या अहमदपूर मतदारसंघाचे आमदार बाबासाहेब पाटील यांना मंत्रिमंडळात प्रथमच स्थान मिळालं आहे.**''

****

एकूण चार महिला मंत्र्यांचा समावेश असलेल्या या या मंत्रिमंडळात गेल्या वेळी मंत्रिमंडळात असलेले भाजपचे रविंद्र चव्हाण, शिवसेनेचे तानाजी सावंत, दीपक केसरकर, अब्दुल सत्तार, राष्ट्रवादी काँग्रेसचे छगन भुजबळ यांना स्थान मिळालेलं नाही.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेकदा आश्वासनं दिली, तरीही मंत्रिमंडळात रिपब्लिकन पक्षाला स्थान दिलं नसल्याने रिपब्लिकन कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचं, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

****

एक राष्ट्र एक निवडणूक या विषयी दोन विधेयकं आज लोकसभेत सादर करण्यात येणार आहेत. कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल संविधान विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा विधेयक सादर करतील. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या उच्च स्तरीय समितीनं लोकसभा आणि राज्यसभेसाठी देशात एक राष्ट्र एक निवडणूक हा प्रस्ताव मांडला होता.

दरम्यान, राज्यसभेत आज आणि उद्या संविधानावर विशेष चर्चा होणार आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २९ डिसेंबरला आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून नागरीकांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११७वा भाग असेल.

****

परभणी हिंसाचार प्रकरणातला आरोपी सोमनाथ सूर्यवंशी याचा काल जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. नांदेड परिक्षेत्राचे उप पोलीस महासंचालक शहाजी उमाप यांनी ही माहिती दिली.

दरम्यान, या घटनेनंतर जिल्हा रुग्णालयात जमाव झाला होता, परभणी शहरासह पूर्णा शहरात तसंच जिल्हाभरात तणाव निर्माण झाला असून, बाजारपेठ, बस सेवा बंद करण्यात आली आहे.
सोमनाथ सूर्यवंशी याचं शव विच्छेदन छत्रपती संभाजीनगर इथल्या रुग्णालयात करण्यात यावं, तसंच मृत्यू झालेल्यांच्या वारसांना ५० लाख रुपयांची मदत देऊन कुटुंबातल्या सदस्याला शासकीय नोकरी द्यावी, अशी मागणी, आमदार राहुल पाटील यांनी केली. जिल्हा रुग्णालयात पाहणीसाठी आल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

****

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान ऑस्ट्रेलियात गॅबा इथं सुरु असलेल्या बॉर्डर–गावस्कर चषक कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात आज ऑस्ट्रेलियाचा संघ पहिल्या डावात ४४५ धावांवर सर्वबाद झाला. जसप्रित बुमराहनं सहा, मोहम्मद सिराजनं दोन, तर नितीश कुमार रेड्डी आणि रविंद्र जडेजानं एक गडी बाद केला. अखेरचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या पहिल्या डावात एक बाद सहा धावा झाल्या होत्या.

****

गोव्यात पार पडलेल्या चौथ्या राष्ट्रीय ओपन तायक्वांदो स्पर्धेत बीडच्या १५ खेळाडूंनी सुवर्ण पदक, एक रौप्य पदक आणि एक कांस्यपदक अशा १७ पदकांची कमाई केली. हे सर्व खेळाडू बीड जिल्हा क्रीडा संकुलातले डॉ. अविनाश बारगजे यांच्या तायक्वांदो प्रशिक्षण केंद्रातले खेळाडू आहेत. देशभरातल्या ८०० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

****

राज्यात तापमानात लक्षणीय घट झाली आहे. काल राज्यात सर्वात कमी किमान तापमान अहमदनगर इथं सहा पूर्णांक चार दशांश सेल्सिअस नोंदवलं गेलं. येत्या दोन दिवसात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. परभणी जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून थंडीचा जोर वाढत असून, काल सर्वाधिक निचांकी चार पूर्णांक सहा दशांश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद झाली.

****

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई इथल्या श्री योगेश्वरी देवीच्या मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवाची काल सांगता झाली. तहसीलदार विलास तरंगे यांनी योगेश्वरी देवीची विधीवत होमहवन आणि महापूजा करून पूर्णाहुती दिली. त्यानंतर सायंकाळी श्री योगेश्वरी देवीची पालखी मिरवणूक अंबाजोगाई शहरातून काढण्यात आली. यावर्षी मार्गशीर्ष नवरात्र महोत्सवाच्या कालावधीत मंदीर परिसरात सलग नऊ दिवस पाच ते सहा हजार महिला आराध बसल्या होत्या.

****